Vol 3 Issue 8 Sept 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-8, Sept-2013
ISSN 2230-7850
Available online at www.isrj.net

# औरंगाबाद जिल्हयातील माध्यमिक स्तरावरील राबविल्या जाणा–या मूल्यशिक्षणाचा चिकित्सक अभ्यास

**दत्ता शं. वाघमारे**
सहाय्यक प्राध्यापक कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन,सोलापूर

***सारांश :***मनुष्यातील पशुत्व दूर सारुन त्याच्यामधील "माणूस" जागा करणे हेच खरे शिक्षण होय. शिक्षणाने विद्यार्थ्याला केवळ बौध्दिकदृष्टया सचेतन करुन भागणार नाही तर त्याच्या वृत्तीत इश्ट ते परिवर्तन घडवून आणले पाहिजे. शिक्षणाने मूल्य रुजविणे व त्यांचे संवर्धन करणे ही प्रक्रिया ज्ञानात्मक,भावात्मक आणि क्रियात्मक अशा मानवी विकासाच्या तीनही क्षेत्रांमध्ये घडवून आणले पाहिजे यासाठी मूल्यांचे शिक्षण देणे आवश्यक आहे.1986चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्येही भारतासारख्या लोकशाही राष्ट्राच्या उज्वल भवितव्यासाठी नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचे संस्कार करणा–या शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादली आहे.

### *प्रस्तवाना :*

एकंदरीत समाजाची स्थिती, तज्ज्ञांचा विचार,विविध समित्या आणि आयोगाच्या शिफारशी लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने 1997– 98 या शैक्षणिक वर्षापासून शालेय स्तरावर पहिली ते दहावीसाठी "मूल्यशिक्षण" या अनोख्या परंतू विद्यार्थ्याच्या जीवनाशी थेट संबंध असलेल्या विषयाचा प्रथमच अंतर्भाव करण्यात येऊन हा विषय अनिवार्य करण्यात आलेला आहे.महाराष्ट्र शासनाने शिक्षण विषयक प्रक्रियेमध्ये सदयस्थितीत प्रमुख आणि आवश्यक अशा दहा निवडक नैतिक मूल्यांचा समावेश करण्याचा विचार झाला आहे व ही दहा मूल्ये पुढीलप्रमाणे ..........

1.संवेदनशीलता 2.वक्तशीरपणा 3.नीटनेटकेपणा 4.स्त्री–पुरुष समानता 5. श्रमप्रतिष्ठा 6.वैज्ञानिकदृष्टीकोन 7.राष्ट्रभक्ती 8.राष्ट्रीय एकात्मता 9. सौजन्यशीलता 10.सर्वधर्मसहिश्णूता.

मूल्यशिक्षण शाळेत राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अशी भूमिका घेतली की, विद्यार्थ्यांना कार्यात्मकतेचे शिक्षण मिळावे व कालानूरूप समाजपयोगी मूल्यांची जोपासना व्हावी या दृष्टीने शालेय स्तरावर मूल्यांचे शिक्षण अनिवार्य करण्याची गरज तीव्रतेने जाणवू लागली.

मूल्यशिक्षणाच्या तासिकेतून मूल्यशिक्षण होईल का?या संदर्भात असे म्हटले जाते की?" Values cannot be taught, they can only be caught " मूल्ये ही शिकविता येत नाहित तर ती आत्मसात करावी लागतात. हे जरी असे असले तरी संस्कार करण्याचा आपण निर्धार करावा याचा अर्थ शाळेत जेवढा वेळ विद्यार्थी असतो त्या वेळेमध्ये तो जो अध्ययन करतो, तो ज्या उपक्रमात सहभागी होतो त्या सर्व कार्यक्रमांची आखणी अशा प्रकारे करायला हवी की, त्यातून विद्यार्थांना मूल्यांची जाणीव होईल व ते मूल्य स्वीकारतील व त्यानूसार आचरण करतील. या भूमिकेतून महाराश्टीं शासनाने शालेय स्तरावर मूल्यांचे शिक्षण सुरू केले.

### *संशोधन समस्येचे शीर्षक :*

"औरंगाबाद जिल्हपातील माध्यमिक स्तरावरील राबविल्या जाणा–या मूल्यशिक्षणाचा चिकित्सक अभ्यास."

### *संशोधनाची उद्दिष्टे*

1.माध्यमिक स्तरावरील राबविल्या जाणा–या मूल्यशिक्षणातील उपक्रमांचा अभ्यास करणे.
2.माध्यमिक स्तरावर सहशालेय उपक्रमातून दिल्या जाणा–या मूल्यशिक्षणाच्या बद्दल विद्यार्थ्याच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
3.माध्यमिक स्तरावर मूल्यशिक्षण राबविणा–या मुख्याध्यापकांच्या भूमिकेचा अभ्यास करणे
4.माध्यमिक स्तरावर मूल्यशिक्षण देणा–या शिक्षकांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
5.माध्यमिक स्तरावर मूल्यशिक्षण राबवितांना येणा–या अडचणींचा अभ्यास करणे.

### *संशोधनाचे महत्व :*

1.महाराष्ट्र शासन जून 1997 पासून महाराष्ट्रात मूल्यशिक्षण हा उपक्रम राबविला जातो. हा उपक्रम राबविण्यामागील शासनाची अपेक्षा कोणत्या आहेत ?याची माहिती शिक्षकांना,विद्यार्थ्यांना समजण्याच्यादृष्टीने संशोधनाचे महत्व आहे.
2. प्रस्तुत योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी शासकीय स्तरावर कोणकोणते प्रयत्न करावे लागतील ?याचे मार्गदर्शन प्रस्तुत संशोधनातून होण्याच्यादृष्टीने सदरहू संशोधनाचे महत्व आहे.
3. प्रस्तुत संशोधन औरंगाबाद जिल्ह्यातील माध्यमिक शाळांपुरते मर्यादित असले तरी इतर जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्याच्यादृष्टीने शासनाला योग्य ती दिशा मिळेल तसेच या सारख्या विषयावर संशोधन करू इच्छिणा–या संशोधकाच्यादृष्टिने प्रस्तुत संशोधनाचे महत्व आहे.
4.मूल्यशिक्षणातील इतर उपक्रम राबवितांना येणा–या अडचणीवर उपाययोजना करण्यासाठी शिक्षकांना व मुख्याध्यापकांना उपयुक्त ठरेल तसेच पालकांना देखील मूल्यशिक्षणाची शाळेतील स्थितीविषयी माहिती मिळणार आहे.

### *संशोधनाची व्याप्ती :*

प्रस्तुत संशोधनात औरंगाबाद जिल्ह्यातील, जिल्हापरिषदेच्या अंतर्गंत येणा–या माध्यमिक शाळांमध्ये राबविल्या जाणा–या मूल्यशिक्षण योजनेचाच विचार करण्यात आलेला आहे.
सदरहू संशोधनात औरंगाबाद जिल्ह्यातील इयत्ता 9 वी व 10वीचे वर्ग असणा–या मराठी माध्यमांच्या अनुदानित व विनाअनुदानित शाळांचाच समावेश करण्यात आलेला आहे.
प्रस्तुत संशोधन हे जरी मूल्यशिक्षण योजनेशी संबंधित असले तरी प्रामुख्याने जून 1997 पासून सुरू झालेल्या मूल्यशिक्षण योजनेच्या सद्यपरिस्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे.

### *संशोधनाची मर्यादा :*

प्रस्तुत संशोधन हे फक्त औरंगाबाद जिल्ह्यातील माध्यमिक स्तर म्हणजेच इयत्ता 9 वी व 10वी व्यतिरिक्त इतर इयत्तांचा विचार केलेला नाही
जिल्हापरिषदेच्या अंतर्गंत येणा–या मराठी माध्यमांच्या अनुदानित व विना अनुदानित शाळां व्यतिरिक्त इतर शाळांचा विचार केलेला नाही.
तसेच सदरहू संशोधनात मूल्यशिक्षण योजनेव्यतिरिक्त इतर योजनांचा विचार केलेला नाही.

### *संशोधनाची कार्यपध्दती :*

प्रस्तुत संशोधन विषयाचे स्वरूप,संशोधनाची उद्दिष्टे, व्याप्ती मर्यादा व तसेच प्रस्तुत संशोधन वर्तमान कालीन असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीमधील शालेय सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

### *संशोधनाची साधने :*

संशोधन समस्येचे स्वरूप व उद्दिष्टे विचारात घे३न संशोधकाला समस्येसंदर्भात माहिती संकलित करण्यासाठी संशोधकाने खालील साधने व तंत्राची निवड केली आहे.

प्रश्नावली : मूल्यशिक्षण देणारे अनुभवी शिक्षक
गटमुलाखत : इयत्ता 9 वी व 10वीचे विद्यार्थ्यांसाठी
मुलाखत : मुख्याध्यापकांसाठी

### *प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड :*

स्तरीय यादृच्छिक नमना निवड पध्दतीचा वापर केला.
औरंगाबाद जिल्ह्यात एकूण 501 माध्यमिक शाळा आहेत त्यापैकी 25 टक्के म्हणजे 125 माध्यमिक शाळांची निवड प्रस्तुत संशोधनासाठी केलेली आहे.
125 माध्यमिक शाळांमधील मूल्यशिक्षण उपक्रम राबविणारे प्रत्येक शाळेमधील दोन शिक्षकांची म्हणजेच 250 माध्यमिक शिक्षकांकडून प्रश्नावली़द्धवारे, इयत्ता 9 वी व 10वीचे (प्रत्येक वर्गातील 10)2500 विद्यार्थ्यांची निवड करून गटमुलाखतीद्धवारे माहिती संकलित करण्यात आली तसेच प्रस्तुत संशोधनासाठी 125 मुख्याध्यापकांमधील 20 टक्के म्हणजेच 25 मुख्याध्यापकांची सहेतूक पध्दतीने मुलाखतीसाठी निवड करून मुलाखती घेण्यात आली.

### *संशोधनात संख्याशास्त्राचा उपयोग :*

संशोधन साधनाद्धवारे संकलित झालेल्या माहितीचा अर्थ लावण्यासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय परिमाणाचा वापर करण्यात आला.

### *उद्दिष्टानूसार निष्कर्ष :*

प्रश्नावली ,मुलाखती व गटमुलाखती यासाधनाद्धवारे प्राप्त केलेल्या माहितीचे विश्लेशण करून संशोधनाच्या उद्दिष्टानूसार पुढालप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

उद्दिष्टक्रमांक 1 : माध्यमिक स्तरावरील राबविल्या जाणा–या मूल्यशिक्षणातील उपक्रमांचा अभ्यास करणे.
1.शाळेत स्वतंत्र संस्कार वर्गाचे आयोजन करणा–या शाळांचे प्रमाण 41 टक्के आहे.
2.शाळेच्या मूल्यशिक्षण परिपाठात दररोज राष्ट्रगीत,प्रार्थना,प्रतिज्ञा,शालेय परिसर स्वच्छता,विशेष बातम्या,दिनविशेष,सुविचार कथन उपक्रम घेणा–या शाळांचे प्रमाण 100 टक्के आहे.
3.श्रमप्रतिष्ठा या मूल्यां संदर्भात शाळेत शालेय परिसर स्वच्छता व वर्गस्वच्छता हा उपक्रम 100 टक्के शाळेत राबविला जातो,तर विद्यार्थ्यात श्रमप्रतिष्ठा वाढीस लागण्यासाठी गावात ग्रामसफाई मोहिम राबविणा–या शिक्षकांचे प्रमाण 30 टक्के आहे.
4.विद्यार्थ्यात वैज्ञानिक दृष्टाकोन निर्माण करण्यासाठी संसर्गजन्य रोग प्रतिबंधक उपचारपध्दतीचे दिग्दर्शन, आरोग्यविषयक सप्ताह साजरे करणे, वैज्ञानिक दृष्टाकोन विषयक साहित्य काचफलकात प्रकाशीत करणे इत्यादी उपक्रमांचे शाळेत आयोजन करणा–या शिक्षकांचे प्रमाण 67 टक्के आहे तसेच पर्यावरण दिनानिमिताने वृक्षदिंडी, प्रभात फे–याचे आयोजन करणा–या शाळांचे प्रमाण 86 आहे.
5.दरवर्षी सहलीचे आयोजन करणा–या शाळांचे प्रमाण 91 टक्के आहे.

6.स्त्री– पुरूष समानतेबद्दल शाळेत कर्तृत्ववान स्त्री– पुरूशांचे समारंभपूर्वक कौतुक समारंभाचे आयोजन 73 टक्के शिक्षक शाळांमध्ये करतात असे दिसून आले. विद्यार्थी व विद्यार्थीनींचे वाढदिवस सारख्याच प्रमाणात साजरे करणा–या शिक्षकांचे प्रमाण 67 टक्के आहे.

उद्दिष्टक्रमांक 2 :माध्यमिक स्तरावर सहशालेय उपक्रमातून दिल्या जाणा–या मूल्यशिक्षणातील उपक्रमाच्या अंमलबजावणीतील विद्यार्थ्याच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
1.मूल्यशिक्षण तासिकेतील परिपरठात कथाकथन,विद्यार्थी मनोगत, उल्लेखनिय घटना,शुभचिंतनाचा उपक्रम,पुस्तक परिचय इत्यादी उपक्रम दररोज घेतल्या जाणा–या शाळांचे प्रमाण 60 टक्के आहे.
2.शाळेतील मूल्यशिक्षणाच्या विविध उपक्रमात सर्व मुले उत्साहाने भाग घेणा–या विद्यार्थ्याचे प्रमाण 86 टक्के आहे तर मूल्यशिक्षणाच्या उपक्रमात विद्यार्थी उपस्थिती दर्शवितात पण उदासीन असतात असे 10 टक्के शिक्षकाचे मत आहे.
3.मल्यशिक्षण उपक्रमातर्गत राष्ट्रगीताचा अर्थ विद्यार्थ्यांना स्पष्ट करून न सांगितलेल्या शिक्षकाचे प्रमाण 100 टक्के आहे.
4.परिपाठ हा प्रेरणादायी व संस्कारक्षम वाटणा–या विद्यार्थ्याचे प्रमाण 19 टक्के आहे तर शालेय परिपाठामुळे नवनवीन माहिती मिळते असे 11 टक्के विद्यार्थ्यांना वाटते.
5.शाळेतील मूल्यशिक्षणाच्या विविध उपक्रमात सर्व मुले उत्साहाने भाग घेणा–या प्रमाण 86 टक्के आहे.
6.मूल्यशिक्षण परिपाठाच्या तासिकेचा जीवनात भरपूर प्रमाणात उपयोग होतो असे 83 टक्के विद्यार्थ्यांना वाटते.

उद्दिष्ट क्रमांक 3 :माध्यमिक स्तरावर मूल्यशिक्षण राबविणा–या मुख्याध्यापकांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
1.मूल्यशिक्षण हे सुध्दा शिक्षण आहे व ते अध्ययन–अध्यापनातून आणि अभ्यासेतर उपक्रमातून साध्य करावयाचे आहे या विधानाशी 98 टक्के मुख्याध्यापकी सहमती दर्शविली आहे.
2.मूल्यशिक्षण परिपाठात शाळेतील सर्व शिक्षकांचा सहभाग सक्रिय असतो असे 85 टक्के मुख्याध्यापकांना वाटते.
3.मूल्यशिक्षणातील उपक्रमांचा विद्यार्थ्यांमधील वर्तन बदल पाहण्यासाठी शाळेत विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे निरीक्षण,संकलित नोंदपत्रके व शिक्षक चर्चेद्धवारे व इतर मूल्यमापन साधने वापरली जातात असा प्रतिसाद 97 टक्के मुख्याध्यापकांनी दिली.
4.मूल्यशिक्षणातील उपक्रमांचे संपूर्ण वर्शाचे नियोजन वर्षाच्या सुरूवातीला सर्व शिक्षक एकत्र बसून करतात असे 94 टक्के मुख्याध्यापकांना वाटते.
5.मूल्यशिक्षणातून अभिप्रेत असलेली मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात रूजली हे अजमावण्यासाठी त्याचे मूल्यमापन केले जाते असे 97 टक्क्यापेक्षा अधिक मुख्याध्यापकांनी मुलाखतीतून निदर्शनास आले.
6.मूल्यशिक्षणाच्या परिपाठात 61 टक्के मुख्याध्यापकांचा सहभाग हा संयोजक या भूमिकेत असतो.
7.मूल्यशिक्षण परिपाठ योजनेत शासनाने सुचविलेल्या विविध उपक्रमात जीवंतपणाचा अभाव,भावस्पर्शी उपक्रमाचा अभाव , शिक्षकांच्या सक्रिय सहभागाचा अभाव, पालकांची उदासिनता कृतिकार्यक्रमाचा अभाव व शिक्षकांची गुणदान करण्याची पध्दती या उणिवा अंमलबजावणीत आहेत असे 70 टक्के मुख्याध्यापकांना वाटते.

उद्दिश्ट क्रमांक 4 : माध्यमिक स्तरावर मूल्यशिक्षण राबविणा–या शिक्षकांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
1.मूल्यशिक्षणाची प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षकांना मूल्यशिक्षणासंदर्भातील प्रशिक्षणाची गरज आहे असे 77 टक्के शिक्षकांना वाटते.
2.मूल्यशिक्षण परिपाठासाठी दिलेला सद्याचा वेळ पुरेसा आहे असे 71 टक्के शिक्षकांना वाटते.
3.मूल्यशिक्षण उपक्रम राबविण्यासाठी संदर्भ व पूरक ग्रंथ शालेय ग्रंथालयातून उपलब्ध होतात असे 77 टक्के शिक्षकांना वाटते.
4.मूल्यशिक्षणाच्या परिभाशेमुळे विद्यार्थ्यांमध्ये शालेय शिस्तीत सुधारणा दिसून येते असे 89 टक्के शिक्षकांना वाटते. मूल्यशिक्षणामुळे विद्यार्थी शाळेत वेळेवर उपस्थित राहतात व विद्यार्थ्यांच्या उपस्थित राहतात व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढणे ही परिवर्तने मूल्यशिक्षणामुळे दिसून येतात असे 70 टक्के शिक्षकांना वाटते.
5.संस्कारक्षम भारत घडविण्यासाठी मूल्यशिक्षण योजना अधिक यशस्वी करण्यासाठी, मूल्यशिक्षणाच्या उपयुक्ततेसाठी राष्ट्रीय सणाच्या सुटह्यटी ऐवजी विविध कार्यक्रमाचे आयोजन 12 टक्के शाळेत आयोजित करतात.
6.मूल्यशिक्षण तासिकेतील विविध उपक्रम राबवितांना शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित असतात असे 92.26 टक्के विद्यार्थ्यांना वाटते.

उद्दिष्ट क्रमांक 5 : माध्यमिक स्तरावर मूल्यशिक्षणातील उपक्रम राबवितांना येणा–या अडचणींचा अभ्यास करणे.
1.श्रमप्रतिष्ठा विषयक उपक्रम राबवितांना 52.04 टक्के शिक्षकांना वेळ अपुरा पडतो, तर विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्व वाटत नाही त्यामुळे काम करण्यास अनुत्सक असतात असा प्रतिसाद देणा–या मुख्याध्यापकांचे प्रमाण 16 टक्के आहे.
2.वैज्ञानिक दृष्टीकोन विषयक उपक्रम राबवितांना ग्रामिण भागात अंधश्रध्देचे प्रमाण अधिक असल्यामुळे व वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या अभावामुळे विविध उपक्रम राबवितांना विद्यार्थी सहभागाचे प्रमाण अल्प असते असे 53 टक्के मुख्याध्यापकांना वाटते.
3.मूल्यशिक्षणविषयक उपक्रम राबवितांना शाळेच्या इतर उपक्रमामुळे प्रस्तुत उपक्रम राबविण्यासाठी वेळ अपुरा पडतो,पालकांची उदासिनता, विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांविषयीची कमालीची उदासिनता व आर्थिक अडचण येतात असे 21 टक्के मुख्याध्यापकांना वाटते.
4.शाळेतील सर्व उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या वर्तनात मोठया प्रमाणात परिवर्तन न दिसण्यामागे विद्यार्थ्यावर पडलेला दूरचित्रवाणीचा प्रभाव,सध्याची सामाजिक, राजकीय परिस्थिती कारणीभूत आहे असे 48 टक्के शिक्षकांना वाटते तर 41 टक्के शिक्षकांना विद्यार्थ्यांची व पालकांची मूल्यांविशयीची अनास्था कारणीभूत वाटते असे 17 टक्के शिक्षकांना वाटते.

उद्दिष्ट क्रमांक 6 : मूल्यशिक्षण राबवितांना येणा–या अडचणींचा शोध घेणे व उपाययोजना सुचविणे.

1.मूल्यशिक्षणविषयक उपक्रम अधिक यशस्वी होण्यासाठी शासनाने उपक्रमशील शाळांना प्रोत्साहन पर बक्षिसे व पुरस्कार द्यावेत असे 71 टक्के उपक्रमशील शिक्षकांना वाटते, उपक्रमशील शिक्षकांना बक्षिसे व पुरस्कार द्याावेत असे 62 टक्के शिक्षकांना वाटते.

2.मूल्यशिक्षणाच्या माध्यमातून संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी शाळेबरोबरच शाळाबाह्म प्रयत्न होणे गरजेचे आहे असे 71 टक्के शिक्षकांना वाटते.

3.स्त्री–पुरूष समानता विशयक उपक्रम राबवितांना येणा–या अडचणी दूर करण्यासाठी शाळेच्या विविध कार्यक्रमात सहभागासाठी मुला – मुलींना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे असे 77 टक्के शिक्षकांना वाटते.

4.शाळांमध्ये मूल्यशिक्षण अधिक परिणामकारकरित्या राबविण्यासाठी कुटुंब संस्था मूल्याधिष्ठित करणे हे उपाय 48 टक्के शिक्षकांना सुचविले आहेत.विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांसदर्भात प्रसार माध्यमांकडून जोरदार प्रयत्न होणे गरजेचे असा उपाय` 33 टक्के शिक्षकांनी सुचविला आहे.

5.शाळेत मूल्यशिक्षणातील विविध राबवितांना यासाठी पुरेसा कालावधीचा अभाव, शाळेमध्ये आवश्यक असणारी भौतिक सोयी – सुविधा व पूरक साधनांच्या उपलब्धतेचा अभाव 33 टक्के शिक्षकांना जाणवतो.

***संदर्भग्रंथ सूची***


बापट,भा.गो.(1988), शैक्षणिक संशोधन. (आवृत्ती तिसरी).पुणे :नूतन प्रकाशन

मुळे,रा.श.व उमाठे,वि.तु.(1998), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे. नागपूर :महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ.

भिंताडे,वि.रा.(1999).शैक्षणिक संशोधन पध्दती. (आवृत्ती चौथी). पुणे :नूतन प्रकाशन.

कुंडले,म.बा.(2003).शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र. (आवृत्ती दहावी). पुणे :श्री विद्या प्रकाशन.

पाण्डेय,रामशकल आणि मिश्रा, करूणाशंकर.(1991).मूल्यशिक्षण.आगरा : विनोद पुस्तक मंदिर.

पंडित,बन्सीबिहारी.(2007). शिक्षणातील संशोधन.पुणे :नित्यनूतन प्रकाशन

संपादक.मूल्यांचे शिक्षण शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका इयत्ता 1ली ते 8 वी.पुणेः जीवन प्रकाशन (महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद)

Koul,Lokesh.(1984).Methodology of Educational Research. Edition Tenth, Noida (U.P.): Vikas Publishing House.

Buch,M.B.(1991).Fourth Survey of Research in Education.(Vol.- I.1983-88). New Delhi : NCERT.

Buch M.B.( Editor). (1979), Second Survey of Research in Education. (1972 - 1978).Baroda: Society for Educational Research and Devlopment.

Buch M.B. (Editor). (2000). Fifth Survey of Educational Research. ( 1988-92 ,Vol. II ) New Delhi: NCERT.

Agarwal, J.C.(1975). Educational Research on Introduction. Second Edition,New Delhi : Arya Book Depot.

Best,J.W. (1982). Research in Education, Fourth Edition.Delhi: Prentice Hall of Indian Private Limited.

www.dauniv.ac.in

www.valueeducation.nic.in (National Resource Center for Value Education)

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

* Google Scholar
* EBSCO
* DOAJ
* Index Copernicus
* Publication Index
* Academic Journal Database
* Contemporary Research Index
* Academic Paper Databse
* Digital Journals Database
* Current Index to Scholarly Journals
* Elite Scientific Journal Archive
* Directory Of Academic Resources
* Scholar Journal Index
* Recent Science Index
* Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net